दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
• वर्ष १६ वे • अंक १४१ • MAHMAR/2006/17212 • रायगड • शनिवार दि.१४ ऑगस्ट २०२१ • किंमत १ ₹ www.raigadnagari.com

# प्रकल्पग्रस्तांच्या मागणीचा सरकारतर्फे सकारात्मक विचार होईल

## केंद्रीय नागरी उड्डाण मंत्री ज्योतिरादित्य सिंधिया यांची कृती समितीला आश्वासन

**दै.रायगड नगरी । दिल्ली**

**केंद्रीय पंचायत राज राज्यमंत्री नामदार कपिल पाटील यांच्यासोबत केंद्रीय नागरी उड्डाण मंत्री ज्योतिरादित्य सिंधिया यांना भेटलेले शिष्टमंडळाशी चर्चा करताना विमानतळाचे काम अद्याप पूर्ण होण्यास अवकाश असल्याने सिडको नामकरणाची घाई का करत आहे, असा सवाल नामदार ज्योतिरादित्य सिंधिया यांनी दिल्ली येथे शिष्टमंडळाच्या बैठकीत केला.**



लोकनेते दि. बा. पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय नामकरण सर्वपक्षीय कृती समितीच्या शिष्टमंडळाने दिल्लीत नवनियुक्त केंद्रीय राज्यमंत्री नामदार कपिल पाटील यांची भेट घेतली समितीने त्यांचे अभिनंदन करून पंतप्रधान नरेंद्र मोदी विषयी आभार व्यक्त केले.या भेटीत विमानतळाच्या नामकरणाबाबत चर्चा करण्यात आली.

नामदार कपिल पाटील यांच्यासमवेत केंद्रीय मंत्री ज्योतिरादित्य सिंधिया यांची त्यांच्या दालनात भेट घेण्यात आली. नामदार सिंधिया यांनी शिष्टमंडळाचे निवेदन स्विकारुन अध्यक्ष दशरथ पाटील व समितीचे म्हणणे ऐकून घेतले. याविषयी बोलताना नामदार जोतिरादित्य सिंधिया यांनी केंद्र सरकार नेहमी भूमिपुत्रांच्या सोबत असल्याचे सांगून अद्याप विमानतळाचे काम पूर्ण झाले नसल्याचे सांगितले. तसेच सिडको नामकरणाची घाई का करीत आहे असा सवालही त्यांनी याप्रसंगी उपस्थित केला, त्याचबरोबर भूमिपुत्रांच्या मागणीचा सकारात्मक विचार केला जाईल असे आश्वासनही त्यांनी यावेळी शिष्टमंडळाला दिले. याप्रसंगी केंद्रीय पंचायत राज राज्य मंत्री कपिल पाटील, यांच्या सोबत शिष्टमंडळात कृती समितीचे अध्यक्ष दशरथदादा पाटील, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, कार्याध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, उपमहापौर जगदिश गायकवाड, जे. डी. तांडेल, संतोष केणे, गुलाब वझे, राजेश गायकर, दीपक पाटील, संतोष घरत, विनोद म्हात्रे, नंदेश ठाकूर, गोपीनाथ म्हात्रे आदी उपस्थित होते.

विशेष म्हणजे केंद्रीय मंत्री ज्योतिरादित्य सिंधिया यांनी शिष्टमंडळाशी संपूर्ण वेळ मराठी भाषेत संभाषण केले. अत्यंत आपुलकीच्या नात्याने त्यांनी या चर्चेत संवाद साधत शिष्टमंडळाला सकारात्मक प्रतिसाद देऊन आश्वस्त केले.

# १२ आमदारांच्या नियुक्तीवरून कोर्टाची टिप्पणी

**दै.रायगड नगरी । मुंबई**

राज्याच्या विधानपरिषदेतील १२ नामनिर्देशित आमदारांच्या रखडलेल्या नियुक्तीबाबतच्या वादावरुन आज मुंबई हायकोर्टानं आपलं मत व्यक्त केलं आहे. यात हायकोर्टानं राज्यपालांनी आमदारांच्या नियुक्तीसाठी अवाजवी विलंब केल्याचं कोर्टानं म्हटलं आहे. या जागा दीर्घकाळ रिकाम्या राहू शकत नाहीत. राज्यपालांच्या अधिकाऱ्यांच्याबाबतीत आम्ही काही गोष्टी विचारात घेतल्या आहेत. जर काही गोष्टी विशिष्ट कारणांसाठी होत असतील तर त्याची कारणीमिमांसा होणं गरजेचं आहे, असं स्पष्ट मत कोर्टानं व्यक्त केलं आहे.



राज्यपाल कुणालाही उत्तर देण्यास बांधिल नाहीत. त्यामुळे त्यांना कोर्टही निर्देश देऊ शकत नाही, असंही कोर्टानं नमूद केलं आहे. पण परिस्थिती आणि जबाबदारीचं भान ठेवत त्यांनी याबाबत लवकरात लवकर निर्णय घ्यायला हवं, असं निरीक्षण नोंदवत कोर्टानं राज्यपाल नियुक्त सदस्यांच्या रखडलेल्या मुद्द्यावरुन दाखल करण्यात आलेली याचिका निकाली काढली आहे.

मुख्यमंत्री आणि राज्यपाल यांच्या सुव्यवस्थेसाठी समन्वय असायला हवा. अशाप्रकारे नामनिर्देशित जागा जास्त काळ रिकाम्या ठेवणं योग्य नाही. राज्यपालांनी यासंदर्भात पुढाकार घेऊन मुख्यमंत्र्यांना उत्तर द्यायला हवं, असंही कोर्टानं म्हटलं आहे.

राज्याचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या मंत्रिमंडळानं विधानपरिषदेतील राज्यपाल नियुक्त सदस्यत्वासाठी १२ जणांची नावं राज्यपालांकडे मंजुरीसाठी पाठवली होती. पण त्यावर राज्यपालांनी अजूनही कोणता निर्णय घेतलेला नाही. जवळपास ९ महिन्यांपासून भगतसिंह कोश्यारी यांनी कोणताही निकाल दिलेला नाही. त्यामुळे हा वाद कोर्टात पोहा-चला. राज्यपाल कायदेशीर कारवाईच्या कक्षेत येत नसले तरी त्यांचे निर्णय कायद्याच्या कक्षेत असणं गरजेचं असल्याच्या मागणीची याचिका कोर्टात दाखल करण्यात आली होती.

# माथेरान घाटातील अपघातग्रस्त तरुणाचा अखेर मृत्यू

**दै.रायगड नगरी । माथेरान**

नेरळ माथेरान घाटातील एका अवघड वळणावर सहा ऑगस्ट रोजी झालेल्या अप-घातात जबर जखमी झालेल्या तरुणाचा वाशी येथील इस्पितळात उपचारादरम्यान मृत्यू झाला असून ह्या दुर्दैवी घटनेमुळे माथेरानमध्ये सुरू असलेल्या कामांमध्ये आदिवासी कामगारांच्या सुरक्षिततेचा मोठा प्रश्न समोर आला आहे.

माथेरान मध्ये सध्या मोठ्याप्रमाणात विविध ठिकाणी कामे सुरू आहेत. त्याकरिता मजूर मिळत नसल्याने अनेक ठेकेदार माथेरान डोंगर परिसरातील आदिवासी बांधवांना माथेरान मध्ये मजुरी साठी आणत आहेत. त्याकरिता ते लहान मोठ्या वाहनाचा उपयोग करताना दिसून येत आहेत असाच एक छोटा पिकअप टेम्पो मागच्या शुक्रवारी मजुरांना खचाखच भरून माथेरान कडे निघाला होता. पण येथील जुमापट्टी वरील एक अवघड चढ वळणावर चालकाचा ताबा सुटून त्याचा अपघात झाला होता. त्यामध्ये तीन किरकोळ तर बाळा ढोले (वय २५ वर्षे रा.भागूची वाडी कर्जत ) हा गंभीर जखमी झाला होता त्यास प्राथमिक उपचारासाठी कर्जत येथील रायगड हॉस्पिटल येथे हलविण्यात आले होते. पण छाती व



डोक्याला मार लागल्याने पुढील उपचारासाठी त्याला वाशी येथील एमजीएम रुग्णालयात हलविण्यात आले पण अखेर मंगळवारी उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. मोलमजुरी करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह .../२

## संक्षिप्त...

### एनसीबीच्या पाच अधिकाऱ्यांवर ड्रग्ज तस्करांचा गोळीबार

**दै.रायगड नगरी । मुंबई**

एनसीबीने गेल्या आठवड्यात पोटातून अमली पदार्थांची तस्करी करणाऱ्या परदेशी नागरिकाला अटक करून १० कोटींचे कोकेन जप्त केले. त्यानंतर एनसीबीने आणखी एक मोठी कारवाई केली आहे. काल रात्री एनसीबीने ड्रग्ज तस्कारांवर कारवाई करत तब्बल १ कोटी रुपयांचे ड्रग्ज जप्त केले आहे. दरम्यान ड्रग्ज तस्कर गँगकडून एनसीबीच्या अधिकाऱ्यांवर गोळीबार करण्यात आला आहे. या हल्ल्यात एनसीबीचे पाच अधिकारी जखमी झाले आहेत. तसेच यातील एका अधिकाऱ्याची प्रकृती गंभीर असल्याची माहिती समोर आली आहे.

नवी मुंबई भागात ड्रग्ज तस्करीचे मोठे जाळे पसरले असल्याची गुप्त माहिती एनसीबीला मिळाली होती. या माहितीच्या आधारे एनसीबीच्या अधिकाऱ्यांनी रात्री उशीरा संबंधित ठिकाणी छापेमारी करण्यात आली. मात्र, ड्रग्ज पेडलरनं एनसीबीच्या अधिकाऱ्यांवर हल्ला चढवला. या हल्ल्यात एनसीबीचे ५ अधिकारी जखमी झाले आहेत. तसेच एका अधिकाऱ्याची प्रकृती गंभीर आहे. या कारवाईत एनसीबीने ड्रग्ज तस्कर गँगच्या म्होरक्याला अटक केली आहे. तसेच यावेळी अधिकाऱ्यांनी एक विदेशी बनावटीचे हत्यार जप्त केले आहे. ही माहिती एनसीबीचे झोनल संचालक समिर वानखेडे यांनी पत्रकार परिषदेत दिली आहे.

# २५ जबरी चोरीच्या गुन्हेगारास पनवेल गुन्हे शाखेकडून अटक

## अटक आरोपीकडून जबरी चोरींच्या गुन्ह्यासह सहा गुन्हे उघडकीस



**दै.रायगड नगरी । पनवेल**

पंचवीस जबरी चोरीच्या गुन्ह्यात अटक वॉरंट निघालेल्या गुन्हेगाराला पनवेल गुन्हे शाखेने अटक केली आहे. सदर गुन्ह्यातील जबरी चोरी केलेले सर्व मोबाईल व मोटार सायकल पोलिसांकडून हस्तगत करण्यात आली आहेत. या गुन्ह्यातील आरोपीविरुद्ध २५ गुन्ह्यात अजामीनपात्र वॉरंट निघाले असून त्याची बजावणी प्रलंबित आहे.

नवी मुंबईचे पोलीस आयुक्त बिपीन कुमार सिंग, गुन्हे शाखेचे अप्पर पो-लीस आयुक्त डॉ. बी जी शेखर पाटील, गुन्हे शाखेचे पोलीस उप आयुक्त प्रवीण पाटील यांनी वाहन चोरी व जबरी चोरीचे गुन्हे उघडकीस आणण्याबाबत आदेशित केले होते. त्यानुसार गुन्हे शाखेचे सहाय्यक पोलीस आयुक विनोद चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा कक्ष २ चे वरिष्ठ पोलिस निरिक्षक गिरीधर गोरे यांच्या नेतृत्वाखाली गुन्हे शाखा कक्ष २ च्या माध्यमातून आरोपींचा शोध सुरू होता. दरम्यान पोलीस उपनिरीक्षक .../२

# सिडकोच्या विशेष गृहनिर्माण योजनेचा १५ ऑगस्ट रोजी ऑनलाईन अर्ज नोंदणी शुभारंभ

**दै.रायगड नगरी । नवीमुंबई**

सिडको महामंडळाच्या कोविड योद्धे आणि गणवेषधारी कर्मचाऱ्यांकरिता असलेल्या विशेष गृहनिर्माण योजनेचा प्रारंभ या वर्षीच्या स्वातंत्र्यदिनी १५ ऑगस्ट २०२१ रोजी होणार असून या दिवशी योजनेच्या ऑनलाइन अर्ज नोंदणीचा शुभारंभ करण्यात येणार आहे. या योजने अंतर्गत सिडकोकडून संपूर्ण महाराष्ट्रातील कोविड योद्धे आणि गणवेषधारी कर्मचाऱ्यांकरिता नवी मुंबईच्या ५ नोड्समध्ये ४,४८८ सदनिका उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

सन २०२० च्या प्रारंभी संपूर्ण जगावर कोरोना (कोविड-१९) महासाथीचे संकट कोसळले. कोरोनाचा प्रसार रोखण्यासाठी संपूर्ण देशभर टाळेबंदी लागू करण्यात आल्याने बहुतांशी दैनंदिन व्यवहार ठप्प झाले होते. परंतु अशा बिकट परिस्थितीतीतही डॉक्टर, परिचारिका, वैद्यकीय कर्मचारी, पोलीस, सफाई कर्मचारी आणि अन्य अत्यावश्यक सेवांमधील कर्मचारी हे कोविड योद्धे बनून, आपल्या जीवाची पर्वा न करता



समाजाप्रतिचे आपले कर्तव्य अव्याहतपणे पार पाडत राहिले. या कोविड योद्ध्यांमुळे मोठ्या प्रमाणावर होणारी संभाव्य प्राणहानी टळली तसेच अत्यावश्यक सेवांचा नागरिकांना अविरतपणे पुरवठा होत राहिला. या कोविड योद्ध्यांप्रति कृतज्ञतेची .../२

> कोविड योद्ध्यांच्या अविरत मेहनतीमुळे आज आपल्याला भविष्याबाबत आशेचा किरण दिसतोय. कोविड योद्ध्यांनी अनुकूल परिस्थितीत देशाच्या रक्षणासाठी अहोरात्र मेहनत केली. त्यांच्या या मेहनतीचा आम्हाला अभिमान वाटतो. त्यांच्या या कार्याला सलाम करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या मार्गदर्शनाखाली सिडको विशेष गृहनिर्माण योजना घेऊन येत आहे.
>
> **एकनाथ शिंदे, मंत्री, नगरविकास व पालकमंत्री ठाणे**

> कोविड योद्ध्यांनी कोरोनापुढे हार न मानता त्या परिस्थितीचा सामना केला. त्यांच्या या लढ्याचा आम्हाला अभिमान वाटतो. कोविड योद्ध्यांप्रमाणेच त्यांच्या कुटुंबाचे योगदानही आपल्याला कोरोनाशी लढा देण्यास महत्वपूर्ण ठरले आहे. त्यांनी आपले वर्तमान सुरक्षित केले आहे, तेव्हा आता त्यांचे व त्यांच्या कुटुंबियांचे भविष्य सुरक्षित करणे ही आम्ही आमची जबाबदारी समजतो. त्यांच्या या योगदानाचा सन्मान करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या मार्गदर्शनाखाली सिडकोने ही विशेष गृहनिर्माण योजना आणली आहे.
>
> **डॉ. संजय मुखर्जी, उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको**

# राज्य उत्पादन शुल्क पनवेलसह भरारी पथक व इतर अधिकारी वर्गाच्या बदल्या

**दै.रायगड नगरी । पनवेल**

राज्य उत्पादन शुल्क भरारी पथक पनवेल याच्या सह पनवेल शहर व पनवेल ग्रामीण येथील अधिकाऱ्यांच्या बदल्या झाल्या असून रिक्त झालेल्या जागेवर कोणते अधिकारी येऊन बसतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.


राज्य उत्पादन शुल्क भरारी पथक पनवेलचे निरीक्षक एस.एस. गोगावले यांची बदली राज्य उत्पादन शुल्क ई विभाग ठाणे येथे निरीक्षक पदी झाली आहे. तर याच विभागात पनवेल येथे दुय्यम निरीक्षक म्हणून काम करणारे एस.एस. गायकवाड यांची राज्य उत्पादन शुल्क पनवेल शहर -१ येथे दुय्यम निरीक्षक म्हणून झाली आहे. पनवेल शहर-१ चे निरीक्षक रणपिसे यांची बदली मुंबई येथे झाली असून त्यांची जागा सध्या रिक्त आहे. तसेच दुय्यम निरीक्षक जितेंद्र माजगावकर यांची औरंगाबाद येथे तर गोविंद पाटील यांची ठाणे येथे बदली झाली आहे. त्याचप्रमाणे राज्य उत्पादन .../२

# केंद्रीय मंत्री कपिल पाटील यांच्या जनआशिर्वाद यात्रेला सोमवारपासून प्रारंभ

## १६ ऑगस्ट ठाणे, १७ ऑगस्ट रायगड दौरा

**दै.रायगड नगरी । पनवेल**

देशाचा कारभार लोकाभिमुख असावा, या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून जनतेचा आशीर्वाद घेण्यासाठी केंद्रीय पंचायत राज्यमंत्री कपिल मोरेश्वर पाटील यांच्याकडून ठाणे व रायगड जिल्ह्यात सोमवारपासून (ता. १६) २० ऑगस्टपर्यंत झंझावाती जनआशीर्वाद यात्रा काढण्यात येणार आहे. या यात्रेत भाजपाचे जिल्हास्तरीय व स्थानिक पातळीवरील नेतेही सहभागी होत असल्याने संपूर्ण वातावरण भाजपामय होणार आहे.



ठाणे जिल्ह्यातून पहिल्यांदाच केंद्रीय मंत्रिपदात सामील होण्याचा बहूमान आगरी समाजातील खासदार कपिल पाटील यांना देण्यात आला. केंद्रात प्रथमच ओबीसी समाजाला २७ मंत्रिपदे मिळाली असून, वर्षानुवर्षे अन्याय झालेल्या ओबीसी व मागासवर्गीय समाजाला प्राधान्य देण्याचा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा प्रयत्न आहे. त्याला ठाणे जिल्ह्यासह कोकणातून नागरिकांची पसंती मिळत आहे. त्यानिमित्ताने जन आशीर्वाद घेण्यासाठी भाजपाकडून यात्रा काढली जात आहे. केंद्रीय राज्यमंत्री कपिल पाटील यांच्याकडून ठाणे व रायगडमधील यात्रेचे नेतृत्व केले जाणार आहे.

ठाणे शहरातील आनंदनगर चेकनाक्याहून १६ ऑगस्ट रोजी यात्रेला सुरुवात होईल. पहिल्या दिवशी ठाणे, कळवा, मुंब्रा, डोंबिवली, कल्याण पूर्व येथून यात्रा जाणार आहे. दुसऱ्या दिवशी १७ ऑगस्ट रोजी अलिबाग, रेवदंडा, पेण, पनवेल, उरण आणि नवी मुंबई परिसरातून यात्रा फिरेल. तिसऱ्या दिवशी १८ ऑगस्ट रोजी कल्याण शहर, शहाड, टिटवाळा, म्हारळ, उल्हासनगर, अंबरनाथ, बदलापूर शहरातील विविध भागातून यात्रा जाईल. चौथ्या दिवशी १९ ऑगस्ट रोजी मुरबाड, किन्हवली, शहापूर, भिवंडी शहरात यात्रा जाणार आहे. तर पाचव्या दिवशी २० ऑगस्ट रोजी भिवंडी .../२

# एम.आय.डी.सी प्रकल्पाबाधित शेतकऱ्यांनी घेतली आ.महेंद्र दळवी यांची भेट

**दै.रायगड नगरी । पेण**

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळा मार्फत पेण तालुक्यातील डोलवी औद्योगिक विकास क्षेत्रासाठी काराव-गडब, डोलवी, वडखळ बोरी ग्रामपंचायत परिसरातील बेणेघाट, कोलवे, वावे, डोलवी, खारकारावी, काराव, खारमांचेळा, खारघाट, खारचिर्बी, खारजांभेळा, खारढोंबी या गावातील जमिन संपादित करण्यात येणार आहे. या भुसंपादनाला येथील शेतकऱ्यांनी विरोध दर्शविला असुन, भुसंपादन रद्द करावे या मागणीसाठी शिवसेनेचे रायगड जिल्हा प्रमुख



आमदार महेंद्र दळवी यांची भेट घेतली व येथील शेतकऱ्यांचा या भुपादनाला विरोध असुन याबाबतीत चर्चा केली व ही बाब शासन दरबारी मांडावी व हे भुसंपादन रद्द करावे या मागणीचे निवेदन त्यांना दिले.

या विषयी संबंधित अधिकारी व उघोग मंत्री सुभाष देसाई यांच्याकडे बैठक लावून या भूसंपादनाला शेतकऱ्यांचा विरोध आहे. याबाबत लवकरच चर्चा घडवुन शेतकऱ्यांची भूमिका शासनाकडे मांडण्यात येईल व शेतकऱ्यांना न्याय मिळवुन देण्यासाठी प्रयत्न करणार असून शेतकऱ्यांचे सोबत असल्याचे आमदार महेंद्र दळवी यांनी यावेळी सांगितले. यावेळी शिवसेनेचे माजी जिल्हा प्रमुख विष्णु पाटील, उपजिल्हा प्रमुख नरेश गांवड, तालुका प्रमुख अविनाश पाटील, रायगड जिल्हा परिषदेचे माजी सभापती संजय जांभळे, काराव-गडब ग्रामपंचायतीचे उपसरपंच लक्ष्मण कोठेकर, माजी उपसरपंच तुलशिदास कोठेकर वडखळ सरपंच राजेश मोकल, .../२

# लोकशाहीचे आकुंचन

संसदीय कामकाजावर कुऱ्हाड चालविण्याचे प्रयत्न कसे असावेत, यासाठी संसदेच्या पावसाळी अधिवेशनाचे दाखले दिले जातील. सदनाच्या दोन्ही बाजूंनी यात हातभार लागल्याने, ही प्रवृत्ती सगळ्यांनाच चिंताक्रांत करणारी आहे. विरोधाच्या नावाखालचा आडमुठेपणा या अधिवेशनात दिसला. बहिष्काराला इष्टापत्ती ठरवीत, अधिवेशनातून काढता पाय घेण्याचे डावपेचही प्रकर्षाने पुढे आले. अधिवेशनातील कामकाजाला श्वासांइतकेच महत्त्व असते. लोकांच्या आयुष्यातील घुसमट दूर करण्याचे प्रभावी साधन म्हणून संसदेच्या दैनंदिन कामकाजाकडे बघायला हवे. वाया गेलेल्या तासांबद्दल दोन्ही सभागृहातील अध्यक्षांनी व्यक्त केलेली हळहळ जनतेचे प्रातिनिधिक मत आहे. संसदेच्या प्रत्येक मिनिटामागे अडीच लाख रुपये खर्च होतात, हे तथ्य आता सर्वसामान्य भारतीयांना माहीत आहे. माहितीचा प्रस्फोट एका टिचकीवर येऊन ठेपला असल्याने, सामान्यांच्या दृष्टीतून बेमालूम निसटण्याचे दिवस संपल्यात जमा आहेत. प्रतितास दीड कोटी आणि प्रतिदिवस साडेदहा कोटी रुपये, ही संसदेच्या अवाढव्य खर्चाची आकडेवारी दडपून टाकणारी आहे. विषयाचे गांभीर्य सिद्ध करण्यासाठी एखाद्या वेळच्या बहिष्काराचे आयुध असतानाही, कामकाजाचा मूळ हेतू गोंधळात गारद करण्याची खेळी बहुतांश सदस्यांनी खेळली. या खेळीमागील कारणे आता नागरिकांना उमगू लागली आहेत. आपण जमा केलेल्या करातून ही चैन चालली असल्याचे कळते, तेव्हा सामान्यांचा उद्वेग टिपेला पोहचतो. प्रसिद्धीच्या नादात प्रयोजनाचा विधायक हेतू लयास चालला असल्याचेही भान लोकप्रतिनिधींना उरलेले नाही. हा खरे तर सामान्यांच्या हक्कांचा संकोच आहे. अधिकारांचे असे आक्रसणे देशहिताला बाधक ठरते. व्यक्तिगत अहंतेच्या विलयातच लोकशाहीचा विकास असतो. वलयाला सरावलेल्या खासदारांनी मूळ तत्त्वांनाच हरताळ फासला. आरोप–प्रत्यारोप ही लोकशाही चिरंतन ठेवणारी प्रक्रिया आहे. मतभेदांनंतरचे राजकीय हेवेदावेही समजून घ्यायला हवेत. वैचारिक परिपक्वतेकडे जाण्याऐवजी संवादालाच हरताळ फासण्याची प्रवृत्ती चुकीचीच नव्हे, तर घातकही आहे. अधिवेशनात संसदेच्या माहिती व तंत्रज्ञानावरील स्थायी समितीच्या बैठकीवर सत्ताधारी सदस्यांनी बहिष्कार घातला. समितीचे अध्यक्ष शशी थरूर यांच्यावर आरोप करीत समितीशी असहकार पुकारला. संसद सुरू असताना समितीचे कामकाज झाले असते, तर पेगॅसस प्रकरणावर सत्ताधारी पक्षाची सकारात्मकता देशाला कळली असती. चर्चेत रुची असल्याचे संकेतही गेले असते. सदनातील; तसेच सदनाबाहेरील भूमिका बघितली, तर सत्ताधाऱ्यांचा हेतू निखळ होता, असे म्हणता येणार नाही. संवादासाठी एका फोन कॉलच्या अंतरावर आहोत, असे सांगून शेतकरी आंदोलनाला सरकारने औपचारिकपणे बेदखल केले. कृषी कायद्यावरील चर्चेबाबतचा कथित 'पुढाकार' पेगॅसस प्रकरणामध्येही दिसला. पंतप्रधान आणि गृहमंत्र्यांची सभागृहातील उपस्थिती चकित करणारीच होती. जे संसदेत तेच संसदेबाहेर, या व्यूहरचनेने आगीत तेल ओतले. सदस्यांच्या बेजबाबदार वर्तणुकीने आणि भाषेने देशातील युवापिढीच्या नजरेत आधीच संसदेची अप्रतिष्ठा झाली आहे. दिवंगत सदस्यांना श्रद्धांजली अर्पण करून पहिल्याच दिवशी सुटी घेण्याची संकल्पना युवकांना मुळीच मान्य नाही. अन्य देशांसोबतची सकारात्मक स्पर्धा दिवसागणिक वाढत चालली असताना, अमूल्य वेळ वाया घालविण्यापेक्षा अधिक काम करून दिवंगत सहकाऱ्यांना आदरांजली वाहण्याची प्रथा सुरू करण्याची मागणीही होत असते. आरोपांच्या कात्रीत सापडलेल्या सरकारने दोन दिवस आधीच अधिवेशन संपवून कळस चढविला. या पार्श्वभूमीवर राज्यसभेचे सभापती व्यंकय्या नायडू आणि लोकसभा अध्यक्ष ओमप्रकाश बिर्ला यांची चिंता समजून घ्यायला हवी. तर्कनिष्ठ चर्चेवर भर देण्याचा सल्ला त्यांनी दिलाच; पण जग आपल्याकडे बघते आहे, तेव्हा सभापतींचा अवमान होणार नाही, ही काळजी घेण्याचीही सूचना केली. या अधिवेशनात २० विधेयके मंजूर झाली असली, तरी ९६ तासांपैकी ७४ तास आणि ४६ मिनिटांचे कामकाज वाया गेले. 'रात्रभर झोपू शकलो नाही,' ही व्यंकय्या नायडू यांची खंत पुरेशी बोलकी आहे. सदस्यांचे टेबलवर चढणे, नियमावलींची फेकाफेक करणे या गोष्टींचा समावेश सभ्य वर्तनात होऊ शकत नाही. बेछूट व संकोचशून्य वर्तनाचे असे सार्वत्रिकीकरण व्यथित करणारे आहे. संसदेसारख्या प्रतिष्ठित स्थळावरील मग्रूर वर्तनाचे प्रतिबिंब गावोगावी पडत असते. अधिवेशन आटोपले. प्रश्न कायम आहेत. कृषी कायद्यांमधील सुधारणांचा तगादा लावणाऱ्या आंदोलकांकडे दुर्लक्ष झाल्याने, अनेक जण दुःखी आहेत. फोन टॅपिंग आणि इंधनदरांतील वाढीने या चिंतेत भर घातली आहे. संसद ही देशाची स्पंदने ऐकण्याची जागा आहे. प्रत्येक गोष्टीत उपक्रम व्यवस्थापनाची भलाई बघायची, की भुकेचे उत्तर शोधायचे, याचा निकाल लागायला हवा. पुढ्यात भरला तलाव असतानाही देश तहानलेला, असे चित्र योग्य नाही.

# उरण पूर्व विभागातील ग्रामपंचायतींचा कचरा रस्त्यावर



**दै.रायगड नगरी । उरण**

स्वच्छ भारत अभियानाचे उरणच्या ग्रामपंचायतींनी तीनतेरा वाजवले आहेत. गावातून गोळा केलेला कचरा रहदारीच्या रस्त्यांवर टाकून या ग्रामपंचायतींनी रस्त्यांचे डंपिंग ग्राउंड केल्याचे चित्र उरण पूर्व विभागातील चिरनेर –कोप्रोली रस्त्यावर दिसून येत आहे मात्र कचऱ्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.

निसर्ग संपन्न डोंगर रांगांनी सजलेला उरणचा पूर्व विभाग उरणचा श्वास म्हणून ओळखला जातो. मात्र या विभागात असणाऱ्या ग्रामपंचायतींच्या हद्दीतील कचरा रहदारीच्या रस्त्यांवर टाकला जात आहे त्यामुळे त्या रस्त्यावरून मार्गक्रमण करणाऱ्या जनतेचा श्वास कोंडला गेला असुन नाक मुठीत धरावे लागत आहे.गाव स्वच्छ करताना गोळा केलेला कचरा या ग्रामपंचायतींचे कर्मचारी घंटा गाडीने रहदारीच्या रस्त्यांच्या बाजूला टाकून देत असल्याने या कचऱ्याच्या दुर्गंधीने रस्त्यावरून जनतेला नाक मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे. सध्या मोठया प्रमाणात कचरा चिरनेर–कोप्रोली मार्गावरील कोप्रोली हद्दीमध्ये कुजला असुन दुर्गंधी पसरली आहे त्यामुळे या दुर्गंधीने साथीचे रोग पसरण्याचा धोका निर्माण झाला आहे. एकीकडे कोरोनामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात येऊन अनेकांनी आपला जी–वही गमावला आहे. या सर्व पार्श्वभूमीवर शासन स्वच्छतेकडे लक्ष केंद्रित करत असताना गावातील ग्रामपंचायत प्रशासन स्वच्छतेचे तीनतेरा वाजवीत असून जनतेच्या आरोग्याशी खेळत आहे. तसेच ग्रामस्वच्छतेसाठी आग्रही असणारे पंचायत समिती प्रशासन सुद्धा ग्रामपंचायतींच्या या अस्वच्छ कारभाराला प्रतिबंध करीत नसल्याने आश्चर्य व्यक्त करण्यात येत आहे. एकंदरीत या ग्रामपंचायती कोरोना महामारीच्या काळात सुध्दा ग्रामस्वच्छतेला हरताळ फासत असल्याने जनतेत संताप व्यक्त होत आहे.

# को.ए.सो.मेढा हायस्कूलच्या माजी विद्यार्थ्यांचा एक हात मदतीचा नव्हे तर कर्तव्याचा

**दै.रायगड नगरी । गोवे–कोलाड**

महाड तालुक्यात झालेल्या मुसळधार पावसामुळे शहरासह तालुक्यातील अनेक गावांमध्ये प्रचंड नुकसान झाले. परिसरातील पूरग्रस्त व दरडग्रस्तांच्या मदतीला राज्यासह जिल्हयातील अनेक दानशूर व्यक्ती, सामाजिक संस्था, गावागावातील नागरीक राजकीय नेते मदतीकरीता पुढे सरसावले आहेत.

याच पार्श्वभूमीवर रोहा तालुक्यातील को.ए.सो.मेढे हायस्कूलच्या इयत्ता १० वीच्या १९९६ च्या बॅचने सामाजिक बांधिलकीच्या नात्याने महाड शहरातील व तालुक्यामधील पूरग्रस्त गावांना आपल्याकडून मदतीचा थोडाफार हातभार लागावा या सामाजिक भावनेतून एक हात मदतीचा नव्हे तर कर्तव्याचा या उद्देशाने मदत करता यावी याकरीता दूरवर राहत असणाऱ्या मित्रांनी व्हॉटसप ग्रुपच्या माध्यमातून एकत्र येत रक्कम जमा केली. व यातून पूरग्रस्तांकरीतांकरीता मदतीच्या स्वरुपात किराणा सामान व पिण्यासाठी पाणी बॉटल्स मदतीच्या स्वरुपात देऊन सामाजिक बांधिलीकी जोपासण्याचा एक छोटासा प्रयत्न करण्यात मेढा हायस्कूच्या माजी विद्यार्थ्यांकडून करण्यात आला.

महाड शहरातील परिसरात पिण्याच्यापाण्याचे बॉटल्स तसेच गावडी गावामध्ये किराणा सामान मदत म्हणून देण्यात आले. यावेळी मेढा हायस्कूल इ.१०वी च्या १९९६ च्या बॅचकडून तुषार म्हात्रे, संतोष जाधव, निलेश ठमके आदी मित्र परिवार मदतकार्यात सहभागी झाले होते.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## माथेरान घाटातील अपघातग्रस्त तरुणाचा अखेर मृत्यू

करणाऱ्या ह्या तरुणांच्या मृत्यूने त्याचा परिवाराचा मोठा आघात झाला असून त्याचे वयस्कर माता पिता पत्नी व आठ महिन्याचे बाळ पोरखे झाले आहे. स्वतःच्या फायद्यासाठी मजुरांना मेंढरसारखे गाडी मध्ये कोंबून वाहतूक करणाऱ्या ठेकेदारावर कायदेशीर कारवाई करून सदर ठेकेदारांच्या कुटुंबाला मदत मिळावी अशी मागणी येथील आदिवासी संघटना करीत असून अशा प्रकारचे अपघात भविष्यात टाळण्यासाठी शासन व पोलीस प्रशासनाने ह्या मजूर वाहतूक करणाऱ्या गाड्यांची तपासणी करून कारवाई करावी अशी मागणी येथे होत आहे.

## २५ जबरी चोरीच्या गुन्हेगारास पनवेल गुन्हे शाखेकडून अटक

मानसिंग पाटील व पो.हवा. सूर्यवंशी यांना मिळालेल्या गुप्त बातमीनुसार भिवंडी येथील अब्बास शब्बर जाफरी (वय–३४) रा. खान कंपाऊंड, शांती नगर,भिवंडी याला ताब्यात घेतले आहे. त्याच्याकडे याबाबत सखोल चौकशी केली असताना त्याने गुन्ह्यांची कबुली दिली आहे. सदर आरोपी कडून कळंबोली, खारघर, पनवेल शहर, रबाळे, मुंब्रा, भिवंडी, टिळकनगर, कोळशेवाडी, ओदोनी टाऊन, भिवंडी, शांतीनगर, कोळशेवाडी, विठ्ठलवाडी, नारपोली, खडकपाडा, कापूरबावडी, वर्तकनगर, कोनगाव, नौपाडा, भोईवाडा याठिकाणी २५ गुन्हे उघडकीस आले आहेत. सदरची कारवाई सपोनि प्रविण फडतरे, गणेश कराड, पो.उपनिरीक्षक वैभव रोंगे, स.फौ. साळुंखे, पो.ह.गडगे, इंद्रजित कानू, रूपेश पाटील, दीपक डोंगरे, प्रफूल मोरे, प्रशांत काटकर, अनिल पाटील, संजय पाटील, सचिन पवार, सचिन म्हात्रे, वाघ, सुनील कुदले, प्रवीण भोपी यांनी केली आहे.

## १५ ऑगस्ट २०२१ रोजी ऑनलाईन अर्ज नोंदणी शुभारंभ

भावना म्हणून या योद्ध्यांचे हक्काच्या घराचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी, महाराष्ट्र शासनाच्या मार्गदर्शनाखाली सिडकोने ही विशेष गृहनिर्माण योजना आणली आहे. सदर गृहनिर्माण योजनेंतर्गत नवी मुंबईच्या तळोजा, कळंबोली, खारघर, घणसोली आणि द्रोणागिरी या ५ नोड्समध्ये ४,४८८ सदनिका उपलब्ध करून देण्यात आली आहेत. एकूण ४,४८८ सदनिकांपैकी १,०८८ सदनिका या प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी (ईडब्लूएस) आणि उर्वरित ३,४०० सदनिका सर्वसाधारण प्रवर्गाकरिता आहेत. तसेच वैधानिक तरतुदींनुसार काही घरे ही अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, भटक्या जमाती, विमुक्त जाती, दिव्यांग प्रवर्गांकरिता राखीव आहेत. महाराष्ट्र शासनाच्या २९ मे २०२० रोजीच्या शासन निर्णयानुसार कोविड–१९ महासाथीच्या काळात रुग्ण सर्वेक्षण, रुग्णांचा माग काढणे, प्रतिबंध, चाचणी, उपचार आणि सहाय्यता उपक्रमांशी संबंधित शासनाच्या विविध विभागांतील कर्मचारी, कोविड संबंधी कर्तव्यावर असणारे आरोग्य कर्मचारी व अन्य कर्मचारी (जिल्हा प्रशासन, पोलीस, होम गार्ड, अंगणवाडी सेविका, वित्त आणि कोषागार, अन्न आणि नागरी पुरवठा, पाणी पुरवठा आणि स्वच्छता, घरोघरी जाऊन सर्वेक्षणाचे नेमून दिलेले विविध विभागांचे कर्मचारी इ.) तसेच कोविड संबंधी कर्तव्यावर असणारे कंत्राटी/बाह्यकंत्राटी/रोजंदारी/तदर्थ/मानधन तत्त्वावरील कर्मचारी यांना या योजनेचा लाभ घेता येणार आहे. याकरिता, या संदर्भात संबंधित कर्मचाऱ्यांकडे सक्षम प्राधिकाऱ्याकडून देण्यात आलेले प्रमाणपत्र असणे आवश्यक असणार आहे.

योजनेशी संबंधित सविस्तर माहिती जसे, घरांचा तपशील, विविध प्रवर्गांकरिता राखीव घरे, अनामत रक्कम, योजनेचे वेळापत्रक B. https://lottery.cidcoindia.com या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या माहिती पुस्तिकेमध्ये (Scheme Booklet) नमूद आहे. तरी अर्जदारांनी या पुस्तिकेचे काळजीपूर्वक अवलोकन करावे. राज्यातील अधिकाधिक कोविड योद्धे आणि गणवेषधारी कर्मचाऱ्यांनी या विशेष गृहनिर्माण योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन सिडकोकडून करण्यात आले आहे.

## राज्य उत्पादन शुल्क पनवेलसह भरारी पथक व इतर अधिकारी वर्गाच्या बदल्या

शुल्क पनवेल ग्रामीणचे निरीक्षक चव्हाण हे नुकतेच सेवानिवृत्त झाल्याने या रिक्त झालेल्या जागांवर कोणकोणत्या अधिकाऱ्यांची वर्णी लागते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## एम.आय.डी.सी प्रकल्पाबाधित शेतकऱ्यांनी घेतली आ.महेंद्र दळवी यांची भेट

सामाजिक कार्यकर्ते अरुण शिवकर, अनिल म्हात्रे संजय पाटील,सिताराम चवरकर, के. जी. म्हात्रे, प्रमोद पाटील, सदानंद ठाकुर,प्रकाश ठाकुर, प्रभाकर पाटील, प्रविण म्हात्रे आदि शेतकरी उपस्थित होते.

## केंद्रीय मंत्री कपिल पाटील यांच्या जनआशिर्वाद यात्रेचा सोमवारपासून प्रारंभ

तालुक्यात यात्रेची सांगता होणार आहे. जन आशीर्वाद यात्रेच्या निमित्ताने केंद्रीय राज्यमंत्री कपिल पाटील यांच्याकडून नागरिक, ग्रामस्थ यांच्याशी संवाद साधण्याबरोबरच विविध योजनांचा आढावा घेतला जाणार आहे. केंद्र सरकारच्या कल्याणकारी योजनांतील लाभार्थींशी संवाद, वरिष्ठ नागरिकांशी भेट, एमआयडीसीतील जमीन मालकांबरोबर बैठक, मच्छीमार, व्यापारी, गोदाम व्यावसायिक आणि शेतकऱ्यांबरोबर संवाद, कोविड रुग्णालयाला भेट, गणेश मूर्तीकारांबरोबर बैठक, भूमिपूत्रांशी संवाद, स्वच्छता अभियान, दिव्यांग लाभार्थींशी चर्चा, भाजपाचे समर्थ बूथ अभियान आदी कार्यक्रमांमध्येही मंत्री कपिल पाटील यांच्यासोबत भाजपा नेते व पदाधिकारी सहभागी होणार आहेत. भाजपाच्या जन आशीर्वाद यात्रेची जय्यत तयारी सुरू असून, भाजपाच्या कार्यकर्त्यांत उत्साह संचारला आहे. यात्रेच्या नियोजनाबाबत विविध बैठका सुरू असून, पद्धतशीरपणे नियोजन केले जात आहे. त्याचबरोबर जास्तीत जास्त समाजघटकांना जोडून घेत नागरिक व ग्रामस्थांच्या अडचणी जाणून घेण्यासाठी प्रयत्न करण्याच्या सुचना दिल्या जात आहेत. केंद्रीय पंचायत राज राज्यमंत्री कपिल पाटील यांच्याकडून तब्बल ४५१ किलोमीटरचा प्रवास यात्रेद्वारे केला जाणार आहे. त्याचबरोबर विविध १७३ कार्यक्रम होणार आहेत. विधानसभा निवडणुकीनंतर प्रथमच एकाच टप्प्यात दोन्ही जिल्ह्यातील विविध भागात भाजपा पोचत आहे. या यात्रेत ठाणे, रायगड, कल्याण, भिवंडी आणि मावळ लोकसभा मतदारसंघातील भागाचा समावेश आहे.

# ई–पीक पाहणी प्रकल्प देशासाठी मार्गदर्शक ठरेल : मुख्यमंत्री

**दै.रायगड नगरी । मुंबई**

येत्या काळात ई–पीक पाहणी मोबाईल ॲप शेतकऱ्यांना आपलेसे वाटेल याबद्दल विश्वास वाटतो. राज्यभरात राबविला जाणारा ई–पीक पाहणी प्रकल्प देशासाठी मार्गदर्शक ठरेल असा विश्वास मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी व्यक्त केला.



येत्या स्वातंत्र्यदिनापासून महसूल आणि कृषी विभागाच्या वतीने ई–पीक पाहणी हा संयुक्त प्रकल्प राबविण्यात येणार असून मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या हस्ते सह्याद्री अतिथीगृह येथे ई–पीक पाहणी प्रकल्पाचे ऑनलाईन लोकार्पण इलेक्ट्रॉनिक कळ दाबून करण्यात आले. यावेळी महसूल मंत्री बाळासाहेब थोरात, कृषी मंत्री दादाजी भुसे, महसूल राज्यमंत्री अब्दुल सत्तार, ऑनलाईन पध्दतीने कृषी राज्यमंत्री डॉ.विश्वजीत कदम, मुख्य सचिव सीतराम कुंटे, महसूल, नोंदणी व मुद्रांक शुल्क विभागाचे अपर मुख्य सचिव डॉ. नितीन करीर, मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव आशिष कुमार सिंह, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव विकास खारगे, कृषी विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, जमाबंदी आयुक्त व संचालक निरंजन सुधांशू, टाटा ट्रस्टचे मुख्य सल्लागार जयंतकुमार बांठिया, टाटा ट्रस्टचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीनाथ नरसिंहन, ई फेरफार प्रकल्पाचे राज्य समन्वयक रामदास जगताप, यांच्यासह महसूल विभागाचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

मोबाईल पचे ऑनलाईन लोकार्पण केल्यानंतर मुख्यमंत्री उद्धव ठाकरे म्हणाले की, काही वर्षांपूर्वी शेतकऱ्याला स्वत:चा सातबारा पहायला मिळण्यासाठी खूप कष्ट करावे लागत असे, पण आज शेतकऱ्यांना आपला सातबारा मोबाईलमध्ये पाहणे शक्य झाले आहे.काळाप्रमाणे बदलणे हा प्रकृतीचा नियम आहे असे आपण म्हणतो मग बदलत असताना आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने आपण नवनवीन प्रयोग करुन शेतकऱ्यांचे कष्ट कमी करण्याबरोबरच त्यांना सोप्या आणि सुलभ पध्दतीने आवश्यक असणारी कागदपत्रे मिळवून देणे, पीकांची माहिती मिळवून देणे यावर भर देत आहोत याचा आनंद वाटतो.कोणताही नवीन प्रयोग करताना यश तेव्हाच मिळते जेव्हा आपण सर्वजण सांघिक प्रयत्न करतो. आपण सर्वांनी सांघिक प्रयत्न केल्यानेच आता आपल्या शेतकरी बांधवांचे कष्ट कमी होण्यास मदत होणार आहे.

मुख्यमंत्री श्री. ठाकरे म्हणाले की, आज दररोज हवामानात बदल होतो आहे. कधी अतिवृष्टीमुळे तर कधी पाऊस न पडल्याने पिकांचे नुकसान होते आहे. अशा काळात शासनाला शेतकरी बांधवांना नुकसान भरपाई देताना अनेक अडचणी येतात कारण त्यावेळी पंचनामे करणे कठीण असते. पण या डिजिटल प्रणालीमुळे शेतकऱ्यांना अधिक मदत होणार आहे.ई पीक पाहणी प्रकल्पामुळे शेतकऱ्याचे आयुष्य अधिक सोपे आणि सहज करण्याला प्राधान्य देण्यात येत असल्याचा आनंद आहे. विकेल ते पिकेल ही संकल्पना राज्यभरात राबवित असताना आपापल्या जिल्हयाचे वैशिष्टय ओळखून एक जिल्हा एक पीक असा ब्रॅड तयार करणे आवश्यक आहे तरच शेतकऱ्यांच्या मालाला हमीभाव नाही तर हमखास भाव मिळेल. येणाऱ्या काळात शेतकऱ्यांनी पिकविलेला भाजीपाला अधिक दिवस कसा टिकवता येईल यासाठी प्रयत्न होणे आवश्यक आहे. महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री आणि हरितक्रांतीचे प्रणेते वसंतराव नाईक यांनी शेतीमध्ये काळाच्या पुढे जाणारे प्रयत्न केले तसेच आताही शेतकऱ्यांना नवीन गोष्टी आणि तंत्रज्ञानाची मदत घेऊन त्यांचे जीवन सोपे आणि सुलभ करण्यावर भर देणे आवश्यक आहे.

# धूम स्टाईल पळून जाण्यासाठी पल्सर दुचाकीचा वापर

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कळंबोली वसाहतीतील मर्निंग वॉकला पायी चालत असलेल्या एका व्यक्तीच्या खिशात असलेला मोबाईल दोन अज्ञात इसमांनी पल्सर या मोटार सायकलवर येत मोबाईल खिशातून काढून चोरून नेल्याची घटना कळंबोली परिसरात घडली आहे. याबाबत कळंबोली पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे.

कळंबोली वसाहतीमधील सुशांत पाटील (वय–३४ वर्षे) राहणार जय माता दि बिल्डींग, सेक्टर ०८, कळंबोली याठिकाणी आपल्या कुटुंबासोबत राहत आहेत. पाटील हे घरगुती जेवणाचे डब्बे पोहोचविण्याचे व्यवसाय करीत आहेत. तसेच कोरोनाच्या पार्शवभूमीवर व्यवसाय बंद पडल्याने साड्या कोठेही नोकरीसाठी नाही. यावेळी रोज सकाळी कळंबोली येथील डीमार्ट भागात मॉर्निंग वॉकला पायी चालत जात असत. नेहमीप्रमाणे पाटील हे सकाळी बाहेर पडले होते.

यावेळी एयर फोन लावून गाणे ऐकत फोन शर्टच्या वरील खिश्यामध्ये ठेवला होता. यावेळी पायी चालत कळंबोली पेट्रोलपंपाचे पुढे असलेल्या सेक्टर ८ चे मैदानालगतच्या रस्त्यावरून जात असताना त्यांच्या पाठीमागुन डाव्याबाजुने एका काळ्या रंगाची पल्सर कंपनीची मोटार सायकल आली. व यातील बाईकवर पाठीमागे बसलेल्या अज्ञाताने पाटील यांच्या शर्टच्या खिशात ठेवलेला ७,०००/– रु.किंमतीचा मोटोरोला कंपनीचा मोबाईल जबरदस्तीने खेचुन ते अज्ञात चोर पसार झाले. याबाबत पाटील यांनी कळंबोली पोलीस ठाणे गाठत तक्रार दिली आहे. याबाबत कळंबोली पोलीस अधिक तपास करीत आहेत.


## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे : चिरनेर, ता.उरण, जि.रायगड येथील महसूल दप्तरी खालील वर्णनाची शेतजमीन मिळकत आमचे अशिलांनी या जमिनीचे मालक १) सौ.हासुबाई नारायण खारपाटील, २) सौ.निराबाई विश्वनाथ पाटील, ३) सौ.चांगुनाबाई बळीराम म्हसकर, ४) सौ.मथुराबाई नारायण पाटील, ५) सौ.बाबीबाई नरेश पाटील, ६) सौ.कुंदा लक्ष्मण जोशी, ७) सौ.वंदना लक्ष्मण जोशी सर्व रा.चिरनेर, ता.उरण, जि.रायगड यांचेकडून कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : चिखली भोम, ता.उरण, जि.रायगड**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्रफळ हे.आर.प्रती | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| ११ | १/क ३ | ०–७०–८<br>पो.ख. ०–०६–३<br>एकूण ०–७७–१ | ९.८७ |

वरील वर्णनाच्या शेतजमीन मिळकतीबाबत कोणत्याही इसमाचा अगर संस्थेच्या साठेकरार विक्री, गहाण, दान, लिज, बक्षिसपत्र, चार्ज, गहाणखत, वहिवारंग, वहिवाट, किवकिवडा, हक्कहितसंबंध वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास किंवा त्याच्या खरेदीखताच्या व्यवहारास हरकत असल्यास संबंधची व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत पुराव्यासह लेखी स्वरुपात पोस्टाने किंवा स्वतःहून हजर होवून आमचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांत कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही किंवा असल्यास तो हक्क हितसंबंध त्यांनी आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिला असून त्याची आमच्या अशिलांच्या लाभांत होणाऱ्या खरेदीखतास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येवून सदरचा कायम खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करण्यात येईल. त्यानंतर मागाहून कोणत्याही प्रकारची हरकत घेतल्यास ती हरकत आमच्यावर अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

दि.१४/०८/२०२१
स्थळ : उरण

सही/–
ॲड.योगेश नामदेव म्हात्रे
रा.कोप्रोली, ता.उरण, जि.रायगड
मो.नं.८०९७१०८०६०/८०९७१०८०६०


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू–२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई–४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल–४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स–२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा–पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## उरणच्या गावांना इंडियन ऑइलटँकिंगची आगळी भेट

**दै.रायगड नगरी । उरण**

कोव्हिड साथीचा मुकाबला करणाऱ्या रायगड जिल्ह्यातील चार गावांत १२६३ लसीकरणे, व बोकडविरा कोव्हिड सेंटरला ४०० लिटर ऑक्सिजनच्या टाक्या पुरवत इंडियन ऑइलटँकिंगने जिल्ह्याशी असलेली बांधिलकी दाखवली आहे. १५ लिटर ऑक्सिजनची गरज असलेल्या २६ रुग्णांना पुरेल अशी सोय उरण तालुक्यातील बोकडविरा केंद्रात झाली आहे. तसेच यापूर्वीच्या आठवड्यात कंपनीने नजिकच्या चार गावांत लसीकरण शिबिरे राबवून १२६५ नागरिकांना पहिली लस पुरवत उरण तालुक्यातील गावपाड्यांत लसीकरण सुलभ केले, तसेच जिल्हा प्रशासनाच्या लसीकरण नियोजनात हातभार लावला. तसेच चिर्ले ग्रामपंचायतीस कंपनीने कचरा संकलन वाहन उरणचे आ.महेश बालदी यांच्या हस्ते उदघाटन करून अर्पण करण्यात आले.

इंडियन ऑइलटँकिंगची ही 'शेजारधर्म मोहीम' उरणमधील धुतूम, रांजणपाडा, जसखार व चिर्ले या चार गावांत राबवण्यात आली. इंडियन ऑइलटँकिंगचे व्हाइस प्रेसिडेंट अतुल खराटे या प्रसंगी म्हणाले, अत्यंत महत्वाच्या जेएनपीटी मार्गावर आमचा हा पेट्रोलियम टर्मिनल असून कोव्हिडच्या पहिल्या लाटेतही आम्ही येथील वस्त्यांच्या मदतीस आलो आहोत. गेल्यावर्षी सुमारे ६०० कुटुंबांना शिधा, मास्क व सॅनिटायझरचे वाटप कंपनीने केले असून, या वर्षी संसर्गाविरुद्ध अजून भरीव मदतीची गरज होती, म्हणून या लसीकरण शिबिरांची कल्पना सुचली.

अपोलो रुग्णालयांच्या विद्यमाने भरवलेल्या या शिबिरांचे लाभार्थी आसपासचे रोजंदार व असंघटित कामगार असतील. कंपनीचे मनुष्यबळ प्रमुख नवीन चंद्रा यांनी म्हटले आहे. रोजंदारीवर गुजराण करणाऱ्या कुटुंबात संसर्ग झाल्यास आख्ख्या कुटुंबाचे आर्थिक नियोजन कोलमडू शकते. या लसीकरणातून निदान एक तरी लस लाभल्याने तालुक्यात तिसऱ्या लाटेचा धोका कमी करण्यात आम्ही हातभार लावल्याचे समाधान आहे. दुसऱ्या लसीकरणाचे वेळापत्रक आखून या लाभार्थींचे लसीकरण पूर्ण करण्यात येईल.

कोव्हिड काळात इंडियन ऑइलटँकिंगने रायगड जिल्ह्यात सुमारे अनेक विकासकामे केली असून यात जिल्हा प्रशासनास कोव्हिड लढ्यात आर्थिक मदत, उरण तालुक्यातील गावांसाठी शिधा व रुग्णवाहिका साहाय्य व धुतूम गावासाठी घनकचरा प्रकल्प, चिर्ले गावासाठी कचरागाडी यांचा समावेश आहे.

# स्वातंत्र्य अमृत महोत्सवानिमित्त फिट इंडिया फ्रीडम रनचे शिरढोण येथे यशस्वी आयोजन

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

येथील पनवेल तालुक्यातील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके यांच्या जन्मभूमीत शिरढोण येथे स्वातंत्र्याची अमृत महोत्सवी रॅली तसेच फिट इंडिया फ्रीडम रन २.० अंतर्गत विविध कार्यक्रमांचे आज आयोजन करण्यात आले होते.



भारत सरकारच्या कला क्रीडा व युवा मंत्रालय संचालित नेहरू युवा केंद्र रायगड, रुरल एन्ड यंग फौंउडेशन, ग्राम संवर्धन सामाजिक संस्था बांधनवाडी (पनवेल) आणि ग्राम पंचायत शिराढोण यांच्या वतीने शुक्रवार, दि. १३ ऑगस्ट रोजी आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके यांच्या जन्मभूमीत म्हणजेच हुतात्मा स्मारक शिरढोण येथे सकाळी १०.३० वाजता स्वातंत्र्याची अमृत महोत्सवी रॅली या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक डॉ.जी.जी. पारेख, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.किरण पाटील, रायगड रुलर व यंग फाउंडेशन अध्यक्ष सुशील साईलकर, ग्राम संवर्धन सामाजिक संस्थेचे अध्यक्ष संतोष ठाकूर, नेहरु युवा केंद्राचे जिल्हा युवा अधिकारी निशांत रौतेला, पनवेल पंचायत समितीचे गटविकास अधिकारी श्री.भोये, पनवेल ग्रामीणचे पोलीस निरीक्षक श्री.रवींद्र दौंडकर, नेहरु युवा केंद्राचे स्वयंसेवक, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

देशाच्या स्वातंत्र्यप्राप्तीसाठी अनेक स्वातंत्र्यवीरांनी आपल्या प्राणांची आहुती दिली तर काहींना तुरुंगवास भोगावा लागला. अशा अनेक बलिदानातून दि.१५ ऑगस्ट १९४७ ला आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळाले आणि यावर्षी स्वातंत्र्याला ७५ वर्षे पूर्ण होत आहेत. या वर्षभरात भारतीय स्वातंत्र्याची समरगाथा नवीन युवा पिढीपर्यंत पोहोचविण्यासाठी केंद्र शासनाच्या युवा कार्यक्रम व खेल मंत्रालयाकडून वतीने स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करण्यात येत आहे. देशभरातून त्यासाठी ७५ जिल्ह्यांची निवड या शुभारंभ कार्यक्रमासाठी करण्यात आली होती, त्यात रायगड जिल्ह्यातील आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके यांच्या जन्मस्थानाची निवड करण्यात आली होती.

आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके यांच्या जन्मभूमीत या कार्यक्रमात दि.०९ ऑगस्ट १९४२ ला अंग्रेजो भारत छोडो म्हणत चले जाओ ची घोषणा देणारे भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील ९८ वर्षीय स्वातंत्र सैनिक डॉ.जी.जी.पारेख हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते व त्यांना कार्यक्रमाचे अध्यक्ष रायगड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील यांच्यासह इतर मान्यवरांच्या उपस्थितीत सन्मानपूर्वक गौरविण्यात आले.

याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.किरण पाटील म्हणाले की, देशालाआर्थिक बलशाली बनविण्यासाठी स्थानिक बचतगट व स्थानिक लघु उद्योजक यांच्याकडून वस्तू खरेदी करून ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना द्यावी. स्वच्छतेच्या सवयी अंगिकारणे, विविध शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी करणे, यासाठी लोकसहभाग वाढवावा.

ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक डॉ.जी. जी.पारेख यांनी या कार्यक्रमाच्या निमित्ताने स्वातंत्र्यलढ्यातील आठवणींना उजाळा देत उपस्थित सर्वांना खादी वापरण्याचे आवाहन केले. लोकांनी त्यांच्या दैनंदिन जीवनात धावणे आणि खेळ खेळणे यासारख्या तंदुरुस्ती राखणाऱ्या फिटनेस उपक्रमात सहभागी व्हावे, यासाठी त्यांना प्रोत्साहित करणे, तसेच लठ्ठपणा, आळशीपणा, तणाव, चिंता, आजार यापासून मुक्तता मिळविणे, हे या उपक्रमाचे उद्दिष्ट आहे. यातील फिटनेस का डोस आधा घंटा रोज मोहिमेद्वारे नागरिकांनी रोज किमान ३० मिनिटे शारीरिक व्यायाम करण्याचा संकल्प करावा, असे आवाहन संतोष ठाकूर यांनी यावेळी केले.

स्वातंत्र्यसैनिकांना मानवंदना देण्यासाठी फिट इंडिया फ्रीडम रन २.० च्या यंदाच्या प्रमुख उपक्रमांमध्ये प्रतिज्ञा, राष्ट्रगीत सादर करणे, फ्रीडम रन, कार्यक्रमस्थळी सांस्कृतिक कार्यक्रम, सहभागासाठी युवा स्वयंसेवकांमध्ये जागरूकता आणि त्यांच्या गावांमध्ये अशाच फ्रीडम रनचे आयोजन याचा समावेश आहे. कार्यक्रमाची सांगता शेवटी प्रतिज्ञा घेऊन आणि तिरंगा फ्रीडम रन करून झाली.

# 'कोशिश फाऊंडेशन'च्या वतीने आयोजित ऑनलाईन वक्तृत्व स्पर्धेचा निकाल जाहीर

**दै.रायगड नगरी । पनवेल**

महानगरपालिकेचे सभागृहनेते परेश ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत असलेल्या 'कोशिश फाऊंडेशन'च्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या ऑनलाईन वक्तृत्व स्पर्धेचा निकाल जाहीर झाला आहे.

मराठी व इंग्रजी या दोन भाषेत आणि तीन गटात हि स्पर्धा झाली होती. गट 'अ' साठी (इयत्ता पहिली ते चौथी) मी वर्गाचा मॉनिटर झालो तर, शाळा कधी चालू होणार?, मी मुख्याध्यापक झालो तर, माझा आवडता विषय, गट 'ब' साठी (इयत्ता पाचवी ते सातवी) मी पंतप्रधान झालो तर, मी देव झालो तर, घराचे प्रतिनिधित्व कुणाकडे? आई कि बाबा?, माझा आवडता विषय, तर गट 'क' साठी (इयत्ता आठवी ते दहावी ) नेतृत्व वारसा हक्काने कि कर्तृत्वाने, माझा आदर्श नेता, पनवेल नगरीच्या विकासात आमदार प्रशांतदादा ठाकूर यांचे योगदान, माझा आवडता विषय, हे विषय या स्पर्धेसाठी होते. या स्पर्धेतील एकूण विजेत्यांना ५० हजार रुपयांची पारितोषिके देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात येणार असून या स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद दिल्याबद्दल पनवेल महानगरपालिकेचे सभागृहनेते व कोशिश फाऊंडेशनचे अध्यक्ष परेश ठाकूर यांनी स्पर्धकांचे आभार मानले.

# आदर्श प्राथमिक शाळा येरळ येथे शालेय गणवेश वाटप

**दै.रायगड नगरी । गोवे-कोलाड**

रायगड जिल्हा परिषद आदर्श प्राथमिक शाळा येरळच्या विद्यार्थ्यांना शालेय गणवेश वाटप शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री रामदास शिंदे यांच्या हस्ते देण्यात आले.

राज्य शासनाकडून प्रतिवर्ष शालेय विद्यार्थ्यांसाठी गणवेश देण्यात येतो. शाळेचे मुख्याध्यापक श्री. खेमसिंग चव्हाण यांनी मुख्याध्यापक पदाचा पदभार स्वीकारल्यानंतर आज तगायत शाळा प्रगतीपथावर असून या शाळेला आय.एस.ओ मनांकन मिळवून देण्यात त्यांचा व त्यांच्या सहकाऱ्यांचा तसेच ग्रामस्थ आणि शाळा व्यवस्थापन समितीचा सिंहाचा वाटा आहे.

या शाळेतून बाहेर पडलेले विद्यार्थी डॉक्टर, मॅनेजर, शिक्षक तसेच अन्य विविध महत्त्वाच्या पदावर कार्यरत असून आज तगायत अनेक अधिकारी वर्गाने तसेच नामवंत व्यक्तींनी शाळेला सदिच्छा भेट देऊन समाधान व्यक्त केले.

शालेय गणवेश वाटप प्रसंगी मुख्याध्यापक खेमसिंग चव्हाण यांनी विद्यार्थ्यांना विशेष मार्गदर्शन केले. यावेळी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष रामदास शिंदे, पोलीस पाटील सुनिल शिंदे, अध्यक्ष विजय साळुंखे, शाळा व्यवस्थापन समिती सदस्या संगीता सावंत, ग्रामस्थ जाधव, शाळेचे उपशिक्षक जगन्नाथ अब्दागीरे, विद्या बुधवंत आदी उपस्थित होते.

# आ.मकरंद पाटील यांचा सुचनेनुसार तातपुत्या स्वरुपात कुरोशी पुलाचे काम सुरु



**दै.रायगड नगरी । माथेरान**

महाबळेश्वर तालुक्यात २२ जुलै रोजी झालेल्या पाऊसामुळे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. त्यामध्ये ३२ गावाची दळणवळणाची जीवन वाहणी कुरोशी पुल वाहून गेला होता गेला पंधरा दिवसापासून या गावाच्या संपर्क तुटला होता.

आमदार मकरंद आंबा पाटील यांनी या पुलाची पाहणी करुन प्रशासनाला सुचना करून तातपुत्या स्वरुपात दळणवळण सुरू करा आशा सुचना केला होता आणि आजपासून या कामाला सुरुवात झाली आहे.

यावेळी महाबळेश्वर तालुक्यातील राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्व नेते व कार्यकर्ते उपस्थित होते. आमदार मकरंद आबां पाटील यांचे सोळशी विभागातील जनतेने आभार मानले.

# कोकण भवनात उत्स्फूर्त प्रतिसादात रक्तदान शिबिर संपन्न

**दै.रायगड नगरी । नवीमुंबई**

सहसंचालक, नगर रचना, कोकण विभाग, नवी मुंबई आणि टाटा मेमोरियल हॉस्पिटल, परळ, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने आज दि.१३ ऑगस्ट रोजी कोंकण भवन येथील दुसऱ्या मजल्यावर असलेल्या महिला भोजन कक्षामध्ये रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचा शुभारंभ महाराष्ट्र नगर रचना विभागाचे संचालक श्री. सुधाकर नांगनुरे यांच्याहस्ते झाला. यावेळी सहसंचालक नगर रचना कोंकण विभाग, श्री. जितेंद्र भोपळे, नगर रचनाकार राजेंद्र चव्हाण, कोंकण भवनातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. विशेष म्हणजे कार्यक्रमासाठी आलेल्या प्रमुख पाहुण्यांनी सर्वप्रथम रक्तदान करुन या शिबिराला सुरुवात केली.



टाटा मेमोरियल हॉस्पिटलमध्ये सध्या कर्करोगाने बाधित रुग्णांवर उपचार घेत असलेल्या रुग्णांना तसेच कोविड-१९ या संसर्गजन्य रोगाने बाधित रुग्णांना रक्ताचा तुटवडा भासत आहे. या अनुषंगाने शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. कोंकण भवन व परिसरातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी तसेच नागरिकांनी सामाजिक बांधिलकी जपत मोठ्या संख्येने रक्तदान करुन या शिबिरात सहभाग नोंदविला. रक्तदान शिबिर आयोजित करताना आयोजकांनी सोशल डिस्टन्सिंगसह मास्क आणि सॅनिटाईझरचा योग्य वापर केला. हे शिबिर यशस्वी करण्यासाठी शासकीय पुनर्नियुक्त माजी सैनिक संघटनेच्या सभासदांनी विशेष परिश्रम घेतले. टाटा मेमोरियल हॉस्पिटल यांच्या रक्तपेढीने या उपक्रमास उत्स्फुर्त प्रतिसाद दिला. यावेळी टाटा मेमोरियल हॉस्पिटल परळ शाखेतून आलेल्या सर्व रक्त संक्रमण अधिकारी व कर्मचाऱ्यांचे सहसंचालक, नगर रचना, कोकण विभाग, नवी मुंबई यांनी शिबिरासाठी दिलेल्या उत्कृष्ट सेवा व सहयोगाबद्दल त्यांचे अभिनंदन करुन आभार व्यक्त केले.

# आसनपोई मधील सद्विचार वाचनालायचे महापुरात मोठया प्रमाणात नुकसान

**दै.रायगड नगरी । महाड**

अतिवृष्टी आणि महापुराचा महाड तालुक्यातील आसनपोई मधील सद्विचार वाचनालयाला फटका बसला आहे. महापुरामुळे वाचनालयाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. वाचकांचे हक्काचे व्यासपीठ पुन्हा उभे राहणे आवश्यक आहे, तरी या दृष्टीने सामूहिक प्रयत्न होणे आवश्यक आहे तसेच काही दानशूर व्यक्तिंनी पुस्तक स्वरूपात देखील मदत करावी असे मत वाचनालयाचे सदस्य परेश सोनावळे यांनी व्यक्त केले आहे.

आसनपोई ला वाचकांची मोठी परंपरा आहे. वाचनालयामध्ये मोठ्या प्रमाणात वाचक आपल्या ज्ञानात भर टाकण्यासाठी येऊन पुस्तके वाचत असतात. ही परंपरा सोशल मीडियाच्या दुनियेत देखील अजूनही चालू आहे. मात्र, नुकत्याच झालेल्या अतिवृष्टी आणि महापुरात वाचनालयाचे देखील मोठे नुकसान झाले आहे.

या वाचनालयातील १२ हजार पुस्तके, १ कम्प्युटर, इन्वर्टर व फर्निचरचे नुकसान झाले असून ते पुन्हा उपयोगात येणार नाही अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. एकंदरीत या वाचनालयाचे ५ ते ६ लाख रुपयांचे नुकसान झाले आहे. पुन्हा या वाचनालयात येऊन वाचकांना वाचनाची संधी मिळावी, यासाठी प्रशासनाने देखील लक्ष देणे आवश्यक आहे, अशी मागणी होत आहे.



## पनवेल महानगरपालिका
## ई-निविदा नोटीस

मा.आयुक्त, पनवेल महानगरपालिका खालील नमूद कामाकरिता योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत व अनुभवी व्यक्ती किंवा, ठेकेदार, संस्था, उत्पादक यांचेकडून ई-निविदा पद्धतीने निविदा मागवित आहेत. कोरी निविदा फॉर्म http://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर दि.१४/०८/२०२१ ते दि.२१/०८/२०२१ पर्यंत सायंकाळी १५.०० पर्यंत उपलब्ध असणार आहेत. सदरच्या ई-निविदा ऑनलाईन कार्यप्रणालीद्वारे स्वीकारण्यात येतील.

| अ.क्र. | कामाबाबत तपशिल | कामाची मुदत | बयाणा रक्कम | कोरी ई-निविदा फॉर्मची किंमत |
|---|---|---|---|---|
| १ | पनवेल महानगरपालिकेस आवश्यक असणाऱ्या Covid Antigen Test kit पुरवठा करणे बाबत. | तीन महिने | रु.५०,०००/- | रु.३०००/- (जी.एस.टी.सह) |

**ई-निविदा प्रसिद्धेचा तपशिल**

| Stage | Date | Time |
|---|---|---|
| Publish Date | 14/08/2021 | At 12:00 |
| Document Download Start Date | 14/08/2021 | At 15:00 |
| Document Download End Date | 21/08/2021 | At 15:00 |
| Pre Bid Meeting | Only Online queries Up to 15/08/2021 | At 15:00 |
| Bid Submission Start Date | 14/08/2021 | At 15:00 |
| Bid Submission End Date | 21/08/2021 | At 15:00 |
| Bid Opening Date | 23/08/2021 | At 15:00 |

सही/-
अतिरिक्त आयुक्त
पनवेल महानगरपालिका

अर्जदारातर्फे वकील
ॲड.प्रितम शा. वासकर

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश सो. वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.९४६/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.२३/०९/२०२१

कै.जनाबाई नामदेव घरत (मयत) तर्फे वारस
१) श्री.गणेश नामदेव घरत
वय : ५० वर्षे, धंदा : शेती
२) कै.जनार्दन नामदेव घरत (मयत) तर्फे वारस
२/१) श्रीमती.अंजना जनार्दन घरत
वय : ५६ वर्षे, धंदा : गृहिणी
२/२) कु.सुशांत जनार्दन घरत
वय : ३२ वर्षे, धंदा : शेती
२/३) प्रशांत जनार्दन घरत
वय : २८ वर्षे, धंदा : शेती
सर्व रा.जासई, ता.उरण, जि.रायगड
२/४) सुमिता जनार्दन घरत (पुर्वाश्रमीची)
सौ.सुमिता सुहास घरत
वय : ३० वर्षे, धंदा : गृहिणी
रा.जासई, ता.उरण, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

तमाम जनतेस ह्या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, कै. जनाबाई नामदेव घरत ह्या दि.०५/०५/२०२१ रोजी मौजे : जासई, ता.उरण येथे मयत झालेल्या असून श्री.गणेश नामदेव घरत... वगैरे हे त्यांच्या सिडकोने संपादीत केलेल्या खाली वर्णन केलेल्या जमीन मिळकतीचे मोबदल्यात मिळणाऱ्या १२.५ टक्केचे विकसित भूखंडस कायदेशीर वारसदार आहेत.

कै.जनाबाई नामदेव घरत ह्यांचे हिश्यास आलेल्या जमीन मिळकतीचे वर्णन :

| गाव | यु.केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. |
|---|---|---|---|---|
| वहाळ | ४२९ बी | १ | ४ | ०-०२-५ |
| | | १ | ६ | ०-०२-५ |
| वहाळ | ३८० सी | ४७७ | ५ | ०-०७-० |
| | | ५२१ | १ | ०-०१-० |
| | | ५२१ | ४ | ०-०२-० |
| वहाळ | ४०१ | ५१९ | १ | ०-२७-० |
| वहाळ | ४०१ | ४७९ | ३ | ०-०५-० |
| | | ४८४ | ३ | ०-०२-० |
| | | ४४८ | ५ | ०-०७-६ |
| | | ४६५ | १२ | ०-१४-० |
| | | ४६७ | ३ | ०-०९-० |
| | | ४७० | ६ | ०-०६-८ |
| वहाळ | ४२९ | ३७ | ६ | ०-०७-८ |
| | | १४ | ३ | ०-०३-० |
| सोनखार | ७७/१ | १२ | २० | ०-०३-० |
| | | १० | २४ | ०-०१-५ |
| | | १० | २१ | ०-०५-१ |
| | | ७ | १३ | ०-०२-० |
| | | ७ | ६ | ०-२०-६ |
| | | ५ | ४८ | ०-०६-१ |
| | | ५ | ३९ | ०-०४-५ |
| | | ४ | ४ | ०-०९-० |
| | | ३ | १० | ०-०४-३ |
| | | १ | ९ | ०-१३-० |
| सोनखार | ७७/३ | २० | २४ पो.ख. | ०-१८-९ ०-००-८ |

श्री.गणेश नामदेव घरत... वगैरे हे कै.जनाबाई नामदेव घरत यांचे कायदेशीर वारसदार आहेत. ह्या हक्काबद्दल कोणीही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटी प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत घ्यावी. मे.कोर्टात प्रत्यक्ष अथवा वकीलामार्फत हजर होवून हरकती घ्याव्यात. जर ह्या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती न आल्यास हे मे.कोर्ट श्री.गणेश नामदेव घरत... वगैरे ह्यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची कार्यवाही करेल व ते जर कै.जनाबाई नामदेव घरत यांचे वारसदार आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांना हे वारसपत्र मंजूर करेल.

आज दि.१३/०८/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/-
क.लिपीक
दि.न्या.क.स्तर, पनवेल

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहा.अधिक्षक
दि.न्या.क.स्तर, पनवेल

# संक्षिप्त...

## मोबाईलद्वारे पोलीस ठाण्यात छुप्या पद्धतीने व्हिडीओ शुटींग करणारा पोलिसांच्या ताब्यात

**दै.रायगड नगरी । पनवेल**

मोबाईलद्वारे पोलीस ठाण्यात छुप्या पद्धतीने व्हिडीओ शुटींग करणाऱ्या व्यक्तीला एनआरआय पोलिसांनी ताब्यात घेऊन त्याचा ५० हजार रुपये किंमतीचा मोबाईल फोन जप्त केला आहे. प्रदिप राजेंद्र चौधरी (३०) असे या व्यक्तीचे नाव असून एनआरआय पोलिसांनी त्याच्या विरोधात शासकीय गुपीते अधिनियमानुसार गुन्हा दाखल केला आहे.

या कारवाईत ताब्यात घेण्यात आलेला प्रदिप चौधरी हा बेलापुर येथील दिवाळे गावात राहण्यास असून गत ९ ऑगस्ट रोजी त्याचे दिवाळे गावातील मालमत्तेच्या वादातुन कमल कोळी, ऐश्वऑर्या कोळी यांच्यासोबत वाद होऊन भांडण झाले होते. हा वाद पोलीस ठाण्यात पोहोचल्यानंतर एनआरआय पोलिसांनी सर्वांना पोलीस ठाण्यात आणले होते.

त्यानंतर पोलीस सदर प्रकरण समजुन घेत असताना, प्रदिप चौधरी हा छुप्या पद्धतीने आपल्या मोबाईलवरुन पोलीस ठाण्यातील गोपनीय दस्ताऐवज व इतर महत्वाच्या साहित्याचे तसेच पोलिसांचे चित्रिकण करण्यास सुरुवात केली होती. हा प्रकार ठाणे अंमलदार असलेले पोलीस उपनिरीक्षक माधव इंगळे यांच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी तत्काळ त्याचा मोबाईल फोन ताब्यात घेऊन त्याची तपासणी केली असता, प्रदिप चौधरी हा छुप्या पद्धतीने शुटींग करत असल्याचे आढळुन आले. प्रदिप चौधरी याने छुप्या पद्धतीने व्हिडीओ रेकॉर्डींग करुन गोपनीयतेचा भंग केल्याने पोलिसांनी स्वत: या प्रकरणात फिर्यादी होऊन प्रदिप चौधरी विरोधात शासकिय गुपीते अधिनियमानुसार गुन्हा दाखल करुन त्याला ताब्यात घेतले. तसेच त्याचा ५० हजार रुपये किंमतीचा ऍपल कंपनीचा मोबाईल जप्त केला.

## अज्ञात इसमाचा मृतदेह सापडला

**दै.रायगड नगरी । पनवेल**

ओवे कॅम्प कडे जाणाऱ्या कच्च्या मातीच्या रस्त्यावर हजरत आमिरशहा रहमतुल्ला अली दर्गाच्या समोर रस्त्याच्या बाजूला, खारघर येथे एका ४० ते ४५ वर्षीय अनोळखी इसमाचा मृतदेह सापडून आला आहे. खारघर पोलीस या इसमाच्या नातेवाइकांचा शोध घेत आहेत.

त्याच्या डोक्याचे केस काळे- पांढरे व बारीक, दाढीमिशी विरळ बारीक, चेहरा गोल, रंग सावळा आहे. त्याची उंची अंदाजे पाच फुट, दोन इंच असून अंगात निळ्या रंगाची ट्रॅक पॅन्ट घातलेली आहे. त्याच्या छातीवर जुन्या जखमेचा व्रण आहे. या इसमाबाबत अधिक माहिती असल्यास त्यांनी खारघर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पो-लीस निरीक्षक विवेक दाभोळकर यांच्याशी संपर्क साधावा.


**वाचकांना विनम्र सूचना**

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**


# नेरळच्या हुतात्मा चौकात मध्यरात्री फडकणार तिरंगा

**दै.रायगड नगरी । कर्जत**

कर्जत तालुक्यातील नेरळ येथील माथेरान फाटा येथे असलेल्या हुतात्मा चौकात भारताचा स्वतंत्रता दिन मध्यरात्री तिरंगा झेंडा फडकवून साजरा केला जाणार आहे.वांगणी रेल्वे स्थानकात धावत्या मेल एक्सप्रेस समोर उतरून एका लहान मुलीचे प्राण वाचविणाऱ्या शूरवीर रेल्वे कर्मचारी मयूर शेळके यांच्या हस्ते मध्यरात्री १२ वाजून एक मिनिटांनी झेंडा फडकवला जाणार आहे.नेरळच्या हुतात्मा चौकात गेली १६ वर्षे मध्यरात्री स्वतंत्रता दिन साजरा केला जात असतो.

कर्जत-कल्याण राज्यमार्ग रस्त्यावर माथेरान फाटा येथे असलेल्या नेरळच्या हुतात्मा चौकात दरवर्षी १५ ऑगस्ट या दिवशी आपल्या देशाचा स्वातंत्र्यता दिवस साजरा केला जातो.मध्यरात्री १२ वाजून १ मिनिटांनी तिरंगा झेंडा फडकवून आणि मिठाई वाटप करून शेकडो तरुणांच्या उपस्थितीत झेंडा वंदन केले जाते.या वर्षी हुतात्मा चौकातील मध्यरात्रीचे झेंडावंदन वांगणी रेल्वे स्थानकात शौर्य गाजविणारा रेल्वे कर्मचारी मयूर शेळके यांच्या हस्ते तिरंगा झेंडा फडकवला जाणार आहे.त्यावेळी नेरळ गावातील तरुण ऍड गजानन डुकरे यांनी सायकलिंग स्पर्धेत केलेल्या विक्रमाबद्दल आणि देवराज गजानन डुकरे या आठ वर्षीय बालकाने दोन क्रीडा प्रकारात विक्रम करून आंतरराष्ट्रीय बुक ऑफ रेकॉर्ड मध्ये स्थान मिळवले आहे.त्याबदडल या तिघांचा सत्कार हुतात्मा स्मारक समितीच्या वतीने उपस्थिती मान्यवर यांचे हस्ते मानपत्र देऊन केला जाणार आहे.कार्यक्रमाला नेरळ मधील तरुण वर्गाने मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन हुतात्मा स्मारक समितीचे अध्यक्ष संतोष पेरणे यांनी केले आहे.हुतात्मा चौकात मध्यरात्री ध्वजारोहण होण्याचे यंदाचे १७वे वर्षे आहे.



## गुटखा-पानमसाला व मद्याचा साठा घेऊन जाणाऱ्या व्यक्तीला अटक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल शहर पोलिसांनी वॅगनार कार मधुन नेला जाणारा गुटखा-पान मसाला व देशी विदेशी मद्याचा साठा जप्त केला आहे. या कारवाईत पोलिसांनी गुटखा व मद्याचा साठा घेऊन जाणाऱ्या सुजित बळीराम गोरे (३४) याला ताब्यात घेऊन त्याची वॅगनार कार देखील जप्त केली आहे. सदर गुटखा-पान मसला व मद्याचा साठा त्याने कुठून आणला व तो कुठे घेऊन जात होता. याबाबत पोलिसांकडून अधिक तपास करण्यात येत आहे.

पळस्पे फाटा येथुन उरणकडे जाणाऱ्या रोडवर मॅरेथॉन बल्डींग जवळ उभ्या असलेल्या एका वॅगेनार कारमधून प्रतिबंधित पानमसाला व सुगंधी तंबाखुचा साठा नेला जात असल्याची माहिती पनवेल शहर पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार सहाय्यक पोलीस निरीक्षक मिलिंद भोसले व त्यांच्या पथकाने बुधवारी सायंकाळी पळस्पे फाटा येथील उरणकडे जाणाऱ्या रोडवर मॅरेथॉन बल्डींग जवळ उभ्या असलेल्या कार जवळ धाव घेतली.

यावेळी सदर ठिकाणी उभ्या असलेल्या वॅगनार कारची तपासणी केली असता, त्यात प्रतिबंधीत असलेला गुटखा व पानमसाल्याचा साठा व देशी विदेशी मद्याचा साठा आढळुन आला. त्यामुळे पोलिसांनी कारमध्ये सापडलेला हजारो रुपये किंमतीचा गुटखा व पान मसाल्याचा साठा व देशी विदेशी मद्याचा साठा कारसह जफ्त करुन कार चालक सुजित गोरे याच्या विरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला. त्यानंतर त्याला ताब्यात घेतले.

## चार चाकी वाहने चोरून त्याद्वारे घरफोडी करणाऱ्या सराईत गुन्हेगारांस खांदेश्वर पोलिसांनी केले गजाआड

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल परिसरातील चार चाकी वाहने चोरून त्याद्वारे घरफोडी करणाऱ्या सराईत दोन गुन्हेगारांस खांदेश्वर पोलिसांनी चोरीच्या चार वाहनांसह ताब्यात घेतले आहे.

खांदेश्वर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील नवीन पनवेल से.-१३ परिसरातून एका ईको गाडीची चोरी झाल्याची तक्रार करण्यात आली होती. त्यानंतर सदर आरोपींनी ती गाडी महात्मा फुले चौक पोलिस ठाणे हद्दीत घरफोडी करण्यासाठी वापरून त्यानंतर कल्याण येथे ती सोडून दिली होती.




यासंदर्भात परिमंडळ- २ चे पोलिस उपायुक्त शिवराज पाटील, सहा पोलिस आयुक्त भागवत सोना-वणे यांच्या आदेशाने खांदेश्वर पोलिस ठाण्याचे वपोनि देवीदास सोनावणे व गुन्हे पोलिस निरीक्षक डि.डि. ढाकणे त्याचप्रमाणे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे अन्वेषण पथकातील सपोनि प्रविण पांडे, पो. उपनिरीक्षक निलेश पोळ, पोहवा महेश कांबळे, सुदर्शन सारंग, चेतन घोरपडे, पो.ना. नवनाथ लवटे, विशाल घोसाळकर, पोशि सचिन सरघर, चेतन वळवी, संभाजी गाडे आदींचे पथक शोध घेत असताना आरोपी सुनिलसिंग गुलाबसिंग दुधानी (वय-२४) व जयकिशन छबीराज गौर (वय-२२) या दोघांना ताब्यात घेऊन अधिक चौकशीत त्यांच्याकडून साडे सहा लाख रूपये किंमतीच्या चार गाड्या हस्तगत करण्यात आल्या आहेत. या दोन्ही आरोपींवर विविध पोलिस ठाण्यांतर्गत सात गुन्हे दाखल आहेत. यांच्या अटकेमुळे वाहनचोरीचे अजून गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता पोलिसांनी वर्तविली आहे.

## जागतिक अवयव दान दिनानिमित्त मरणोत्तर अवयव दानाचा संकल्प

**दै.रायगड नगरी । उरण**

मरावे परी अवयव रुपी उरावे. अवयव दान कोणीही करु शकतो, अवयव दानास ना जात आडवी येतो ना धर्म.म्हणुनच अवयव दान हे सर्व जाती- धर्मात सर्वश्रेष्ठ मानले जाते.१३ ऑगस्ट हा जागतिक अवयव दान दिन म्हणुन जगभर साजरा होत असल्याने नवी मुंबई-उलवे येथील वटवृक्ष सामाजिक संस्थेचे अध्यक्ष करण माधव यांनी जागतिक अवयव दान दिनानिमित्त मरणोत्तर अवयव दान करण्याचा संकल्प एम जी एम न्यु बॉम्बे हॉस्पिटल वाशी, नवी मुंबई येथील विभागीय अवयव प्रत्यारोपण समन्वय समिती येथे केला.



मुत्युनंतर कुणाचे तरी जीवन फुलवूया या विचाराने वाटचाल करित गेल्या वर्षी १० जून रोजी जागतिक नेत्रदान दिनानिमित्त मरणोत्तर नेत्रदान केले तर या वर्षी अवयव दानाचे संकल्प पुर्ण करुन किरण मढवी यांनी समाजासमोर नवा आदर्श ऊभा केला आहे. एखाद्या व्यक्तीवर अंत्यसंस्कार केल्यावर त्याच्या शरीरातील महत्वाचे अवयव नष्ट होतात. मात्र मृत्युनंतर तेच अवयव दान केल्याने अनेक रूग्णांना जीवनदान मिळू शकतो. त्यामुळे समाजात अवयव दानाचे महत्व नागरिकांना कळावे यासाठी किरण मढवी यांनी स्वत: संकल्प करून पुढे वटवृक्ष सामाजिक संस्था व ईतर वैद्यकीय सामाजिक कार्य करणाऱ्यांसोबत समाजात जणजागृती अभियान राबवणार असल्याचे मत यावेळी करण माधव यांनी व्यक्त केले.यावेळी वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ते विजय विटेकर यांच्या मार्गदर्शाना खाली त्यांनी मरण-ोत्तर अवयदानाचा संकल्प पुर्ण केले.

## नांदगाव मंडळ सजामध्ये ई-पीक पाहणी प्रशिक्षण कार्यक्रम संपन्न

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

मुरुड तालुक्यातील नांदगाव मंडळ सजामध्ये माझी शेती, माझा सातबारा, मीच लिहिणार माझा पीकपेरा कार्यक्रमांतर्गत विहूर, मजगांव, काशिद, उसरोली, वेळास्ते व नांदगाव ग्रामपंचायत स्तरावर ई-पीकपाहणी प्रशिक्षण कार्यक्रम संपन्न झाला.

मुरुड तहसील कार्यालयाचे नांदगाव मंडळ अधिकारी किरण जुईकर, तलाठी अरविंद देशमुख (नांदगाव), राजेंद्र पाटील (काशिद), वरदा मयेकर (विहूर), संगीता भाटकर (उसरोली) तसेच ग्रामपंचायतींचे सरपंच, उपसरपंच, सदस्य, कर्मचारी यांसह शेतकरी बांधव उपस्थित होते.

यावेळी शेतकऱ्यांना त्यांच्या सातबारा वरील पीकपेरा भरणेबाबत ई-पीक पाहणी ॲप्स चा वापर करून सातबारा वर स्वत:च्या शेतातील स्वत: पीकपेरा भरणे बाबत जनजागृती करुन शेतकऱ्यांना प्रशिक्षण देण्यात आले.

## पनवेल तालुका पत्रकार विकास मंचाकडून जिल्ह्यातील पूरग्रस्तांना मदतीचा हात

### तहसीलदार विजय तळेकर यांच्याकडे केला आर्थिक योगदानाचा धनादेश सुपूर्द



**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल तालुक्यातील सक्रिय पत्रकारांची नोंदणीकृत संघटना असणाऱ्या पनवेल तालुका पत्रकार विकास मंचाने आपली सामाजिक बांधिलकी जपत रायगड मधील पूरग्रस्तांना उभारणी देण्याच्या उद्देशाने आर्थिक योगदान दिले आहे. शुक्रवार दिनांक १३ ऑगस्ट रोजी पनवेलचे तहसीलदार यांच्याकडे मंचाच्या सदस्यांनी धनादेश सुपूर्द केला.

अध्यक्ष माधव पाटील, सल्लागार डॉक्टर संजय सोनवणे यांच्या मार्गदर्शनाने पनवेल तालुका पत्रकार विकास मंचाने नुकत्याच झालेल्या मासिक बैठकीमध्ये पूरग्रस्त बांधवांना उभारणी देण्याचे कामी आर्थिक योगदान देण्याचे ठरविले. तमाम सदस्यांनी आपापले योगदान देत खारीचा वाटा उचलला. सदर योगदान राज्य आपत्ती नियोजन निधी मध्ये देण्यात आले आहे. रायगड जिल्ह्यामध्ये महापुराने थैमान घातले होते ज्यामध्ये शेकडो संसार कोलमडून पडले, कित्येकांना हकनाक प्राण गमवावे लागले, तळीये सारखे तर संपूर्ण गाव उध्वस्त झाले आहे. प्राथमिक पातळी मध्ये आवश्यक ती मदत केल्यानंतर आता पूरग्रस्त बांधवांना आवश्यकता आहे भक्कम पुनर्वसन निधीची! याचे भान ठेवून पनवेल तालुका पत्रकार विकास मंचाने आर्थिक यो-गदान दिले आहे. सचिव मंदार दोंदे यांच्यासह मंचाच्या सदस्यांनी तहसीलदार विजय तळेकर यांच्याकडे धनादेश सुपूर्द केला. त्यावेळी त्यांच्यासमवेत उपाध्यक्ष हरेश साठे, विवेक पाटील, संजय कदम, अविनाश कोळी, तृप्ती पालकर, राजू गाडे, प्रविण मोहोकर, अनिल कुरघोडे, अनिल भोळे, दिपक घोसाळकर, गौरव जहागीरदार, विकास म्हात्रे आदी मान्यवर उपस्थित होते.

> पनवेल तालुका पत्रकार विकास मंचाचे मी मनःपूर्वक आभार मानतो. शासनाचे हात बळकट करण्यासाठी त्यांनी जे यो-गदान दिले आहे ते निश्चितच कौतुकास्पद आहे. पूरग्रस्तांच्या मदतीसाठी आमच्या माध्यमातून पंचवीस ट्रक साहित्य पाठवण्यात आले आहे. तसेच अनेक सेवाभावी संस्थांच्या माध्यमातून पुराचे पाणी ओसरल्या दिवसापासून आम्ही अन्नछत्र सुरू केले होते. अजूनही मदतीचा ओघ सुरू आहे.पुन्हा एकदा पनवेल तालुका पत्रकार विकास मंचाच्या तमाम सदस्यांचे मनःपूर्वक आभार
>
> **विजय तळेकर, तहसीलदार, पनवेल**

## वसुधा सोसायटीतील बांधकामा विरोधात विडसई व वाफेघर ग्रामस्थ आक्रमक

### चौथ्या दिवशीही पाली तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरु

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

सुधागड तालुक्यातील वसुधा सामाजिक वनीकरण संस्था व वाफेघर व विडसई ग्रामस्त यांच्यातील वाद पुन्हा एकदा उफाळला आहे. वसुधा सामाजिक संस्थेने एका प्लॉटवर मुंबई उच्च न्यायालयात प्रकरण प्रलंबित असतांना अनधिकृतपणे आरसीसी बांधकाम सुरू केले आहे. असा आरोप करत हे बांधकाम थांबविण्यात यावे अशी मागणी विडसई व वाफेघर येथील ग्रामस्थांनी केली आहे. त्यासाठी मंगळवारी (ता.१०) दुपार नंतर पाली तहसील कार्यालयासमोर ग्रामस्थ सुधीर वाघमारे यांनी आमरण उपोषण सुरू केले आहे. शुक्रवारी (ता.१३) याबाबत कोणताही तोडगा न निघाल्याने हे उपोषण सुरूच होते. जोपर्यंत आमची मागणी मान्य होत नाही समाधानकारक तोडगा निघत नाही तोपर्यंत आम्ही कदापि माघार घेणार नाही असा इशारा उपोषणकर्ते वाघमारे यांनी दिलाय.



ग्रामस्थांनी दिलेल्या निवेदनात म्हंटले आहे की वसुधा संस्थेत प्लॉट नंबर ८ अ मध्ये अनधिकृत बांधकाम चालू आहे. हे बांधकाम थांबविण्यात यावे यासंदर्भात मे व जून महिन्यात तहसील कार्यालयास दोन वेळा पत्र देण्यात आली होती. त्यानंतर तहसीलदारांनी ग्रामस्थांना तेथे कोणतेही बांधकाम होणार नाही असे पत्र दिले होते. तरी देखील तिथे आरसीसी बांधकाम सुरू असल्याने ग्रामस्थांनी अखेर उपोषण सुरू केले आहे. यावेळी राजेश बेलोसे व ग्रामस्थ उपस्थित होते. वसुधा सोसायटी विरोधात पुन्हा पुन्हा ग्रामस्थांचा रोष उफाळून येत असल्याने यावर कायमस्वरूपी तोडगा कधी निघणार? व ही वारंवार होणारी उपोषणे , आंदोलने कधी थांबणार असा सवाल या निमित्ताने उपस्थित होतोय.

## माणगांव तालुक्यात कांचनबेन भबूतमलजी जैन व अभय पार्शव मनी ट्रस्टद्वारे मोफत रक्त तपासणी शिबीर

**दै.रायगड नगरी । माणगाव**

माणगांव तालुक्यातील विविध गावांमध्ये कांचनबेन भबुत मलजी जैन व अभय पार्शव मनी ट्रस्ट द्वारे मोफत रक्त तपासणी ११ व १२ ऑगस्ट रोजी करण्यात आली. सदरच्या रक्त तपासण्या साई बौद्धवाडी, बाट्याची वाडी, राजीवली, निळगून, सुर्ले, इंदापूर, गोरेगाव पोलीस ठाणे, विहुले या ठिकाणी करण्यात आल्या.

या रक्त तपासणी शिबिरात एकूण सोळा रक्त तपासण्या करण्यात आल्या. यावेळी ७४७ लोकांनी या रक्त तपासण्या करून लाभ घेतला.या कांचनबेन भबुतूमलजी जैन ट्रस्टचे प्रमुख प्रकाश जैन व अभय पार्शव मनी ट्रस्टच्या प्रमुख मनीषा जैन या सातत्याने ग्रामीण व शहरी भागात समाज उपयोगी कामे करीत असतात. या रक्त तपासण्या करण्यासाठी स्पेक्टरम लॅबोर टीज वरळी मुंबई यांचे सहकार्य लाभले. दोन दिवसाचे मोफत रक्त तपासणी शिबीर यशस्वी होण्यासाठी त्या गावातील लोकांनी मोलाचे सहकार्य केले. तसेच मोहन प्रजापती, सिद्धार्थ मोरे, उमर सोलकर, संजय गमरे यांचे सुद्धा योग्य सहकार्य मिळाल्यामुळे ट्रस्ट द्वारे सर्वांनचे आभार व्यक्त करण्यात आले.



## ऐतिहासिक चवदार तळ्यातील गाळ व पाणी स्वच्छ करण्यासाठी आ.भरतशेठ गोगावले यांचे प्रयत्न

**दै.रायगड नगरी । महाड**

ऐतिहासिक चवदार तळयातील गाळ, चिखल काढून पाणी स्वच्छ करण्यासाठी व चवदार तळ्याचे ऐतिहासिक महत्व जपण्यासाठी महाडचे कार्यसम्राट आमदार श्री .भरत शेठ गोगावले यांनी आंबेडकरी चळवळीतील विविध संस्था, संघटनांचे प्रतिनिधी यांची संयुक्त मिटींग घेतली.

सदरच्या मिटींगमध्ये आंबेडकरी कार्यकर्त्यांची मनोगत विच-ारात घेऊन तळ्यातील गाळ काढून पाणी पिण्यायोग्य करू सदरच्या कामासाठी निधीची कमतरता भासू दिली जाणार नाही. छत्रपती शिवाजी महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर या महामानवांच्या या ऐतिहासिक भूमीचे जतन करू या.असे आमदार भरत शेठ गोगावले यांनी सांगितले. सदर मिटींगसाठी प्रांताधिकारी पूदलवाड मॅडम, तहसिलदार काशिद, दलित मित्र मधूकर गायकवाड, सजन पवार, विश्वनाथ सोनावणे, सखाराम सकपाळ, केशवहाटे, के.के. हाटे, लक्ष्मण जाधव, अशोक मोहिते, प्रभाकर खांबे, मोहन धोत्रे, विश्वास यादव, अरुण कासारे, सिद्धार्थ शिर्के, दिपक मोरे, भिमराव धोत्रे, डॉ . महेंद्र शिर्के तालुकाप्रमुख सुरेश महाडीक, संपर्क प्रमुख विजय सावंत, सिद्धेश पाटेकर आदी कार्यकर्ते उपस्थित होते.